SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416004 महाराष्ट्र
'A' Re-accrediated by NAAC (2014)With CGPA-3.16
PHONE: EPABX – 0091-0231-2609000 CoE Office: 0231-2609067
B.A. Exam. Section: 0231-2609116 FAX: 0091-0231-2690655
Website: www.unishivaji.ac.in E-mail: coe@unishivaj.ac.in

---

संदर्भ क्र: शिवाजी वि/बी.ए./परीक्षा/३८१ दिनांक :- २०-४-२०१६

प्रति,

मा. प्राचार्य
संलग्नीत सर्व कला महाविद्यालये
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय :- बी.ए. भाग-१ सत्र १ व २ च्या गुणांच्या एंट्री बाबत..........

महोदय,

मार्च/एप्रिल, २०१६ मध्ये झालेल्या बी.ए. भाग-१ सत्र १ व २ च्या परीक्षा ३-४-२०१६ रोजी संपलेल्या आहेत, सदर परीक्षांच्या पेपरचे मूल्यमापन महाविद्यालय पातळीवर पूर्ण करुन त्यांच्या गुणांची एंट्री ज्या त्या महाविद्यालयामध्ये केली जाते.

प्रथम वर्षाचा शेवटचा पेपर दि. ३/४/२०१६ रोजी झाल्यामुळे प्रथम वर्षाचा निकाल तीस दिवसांत म्हणजेच ३-५-२०१६ रोजी जाहिर होणे आवश्यक आहे. तथापी आज रोजी संगणक प्रणालीमधून काढलेल्या सत्र २ च्या गुणांच्या Data Entry Report वरुन असे दिसून येते की शेवटचा पेपर होवून २० दिवस झाले तरी पेपर तपासूण काही महाविद्यालयांनी ५० टक्के, काहीनी २५ टक्के काम पूर्ण केलेले आहे तर काही महाविद्यालयांनी अद्यापी डाटा एंट्री सुरु केल्याचे दिसून येत नाही. ज्या महाविद्यालयांनी ई-मार्कलिस्ट जमा केलेल्या आहेत त्यांचाही डाटा पेंडींगमध्ये दिसून येतो, यावरुन असे दिसून येते की गुणांची एंट्री केली आहे, प्रिंट काढल्या आहेत पण Data Confirm केलेला नाही, Data Confirm न केल्यास तो विद्यापीठाच्या संगणक प्रणालीमध्ये दिसून येत नाही, तरी सर्व एंट्री पूर्ण झाल्यानंतर न विसरता Data Confirm करुनच ई-मार्कलिस्ट प्रिंट काढून विद्यापीठामध्ये जमा कराव्यात

सबब सर्व महाविद्यालयांना आदेशान्वये कळविण्यात येते की निकाल वेळेत जाहिर करण्याच्या दृष्टीने आपल्या महाविद्यालयाच्या सत्र १ व २ च्या उत्तरपत्रिका वेळेत तपासून त्यांच्या गुणांची एंट्री लवकरात लवकर करावी. जे महाविद्यालय वेळेत काम पूर्ण करणार नाही त्यांचा निकाल सर्व महाविद्यालयां सोबत जाहिर न करता त्यांचा निकाल स्वत्रंत उशिरा जाहिर करण्यात येईल.

तसेच अद्यापी काही महाविद्यालयांनी सत्र ६ चे टर्म वर्क व एनएसएस च्या गुणांच्या हार्ड कॉपी जमा केलेल्या नाहीत त्याही लवकरात लवकर जमा कराव्यात. महाविद्यलयाने उपरोक्त गुण व्यवस्थीत भरलेले नाहीत व वेळेत जमा केले नाहीत व विद्यार्थ्यांच्या निकालामध्ये काही त्रुटी निर्माण झाल्यास त्यास महाविद्यालय जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

सही/-
उपकुलसचिव (परीक्षा)